**रे.के.नं. १८६/२०२४**
**नि.क्र. ३०/क**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ अमित जयबहादुर सिंग यांचा उलटतपास आरोपीचे वकिल श्री. सी. बी. म्हात्रे यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

२. मला मराठी समजते परंतु चांगल्या पद्धतीने बोलता येत नाही. त्यामुळे मला पुरावाकामी प्रश्न हिंदी भाषेत विचारल्यास सोयीस्कर होईल. मी आजरोजी उलवे येथे राहतो. मी आजरोजीसुद्धा पेट्रोलपंप वर मॅनेजर पदावर कार्यरत आहे. मी तेथे मागील ३ वर्षांपासून कार्यरत आहे. ते पेट्रोलपंप निश्चित कोणत्या भुमापन क्रमांकात आहे, याची मला माहिती नाही. त्या पेट्रोलपंप असलेल्या जागेच्या चारही बाजूस असलेल्या शेतांचे भुमापन क्रमांक व मालकाचे नाव मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे शेत पेट्रोलपंपच्या उत्तरेस आहे. आरोपींच्या शेताचा भुमापन क्रमांक मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलपंपच्या पश्चिमेस जेएनपीटी जाणारा महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलपंपाच्या पूर्वेस गाव आहे. हे मला माहित नाही की, पेट्रोलपंप व आरोपीच्या जागेच्या मधून गावाकडे जाणारा एक रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व पेट्रोलपंपाच्या मालकांत जागेच्या सीमेवरून वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचा दिवाणी दावा न्यायालयात प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १६.०७.२०२४ रोजी झालेल्या मोजणीच्या अगोदर तेथे कोणताही पत्रा लावलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोजणीची नोटीस आरोपींना गेलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीच्या वेळेस आरोपी तेथे हजर नव्हते. भुमापकाने तेथे पत्रे लावण्यासंबंधी पेट्रोलपंप मालकास लिखीत आदेश दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी ही महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम कायद्यांतर्गत केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, भुमापकास पत्रे लावण्यास तोंडी किंवा लेखी आदेशीत करण्याचा अधिकार नाही. हे मला माहिती नाही की, भुमापक हा मोजणीची माहिती तहसिलदारांना देतो व त्यानंतर तहसिलदार जागेचा

ताबा देण्यासंबंधी आदेश करतात. हे मला माहित नाही की, तहसिलदाराने पत्रे लावण्याचा आदेश दिला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, पत्रे लावलेली जागा पेट्रोलपंप मालकाच्या मालकीची असल्याची कागदपत्रे मी पोलीसांना दिली नव्हती. मी पोलीसांना मोजणीचा नकाशा दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, ज्या जागेवर पत्रे लावले होते ती जागा व ते पत्रे पेट्रोलपंप मालकाचे नव्हते.

३. दिनांक २१.०७.२०२४ रोजी मी पेट्रोलपंपवर होतो. घटना ही दिनांक २१.०७.२०२५ रोजी घडली होती. मोजणी ही दिनांक १६.०७.२०२५ रोजी घडली होती. घटना ही दिनांक २१.०७.२०२५ रोजी घडल्याचे व मोजणी दिनांक १६.०७.२०२५ रोजी घडल्याचे मी पोलीसांना फिर्याद देतांना सांगितले होते. फिर्यादमध्ये मोजणीची व घटनेची तारीख मी सरतपासात सांगितल्याप्रमाणेची का नमुद नाही, याचे कारण मला सांगता येत नाही. घटनेच्यावेळी पेट्रोलपंपावर ६-७ व्यक्ती होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या पेट्रोलपंपवर बरीचशी वाहने जसे की ट्रेलर इत्यादी पेट्रोल भरण्यासाठी येत असतात. पत्रे व पोल लावलेल्या जागेला सिमेंट कॉंक्रिट केलेले नव्हते. ज्या ट्रेलरने पत्रे काढले तो किती चाकी होता ते मला आठवत नाही परंतु तो मोठा ट्रेलर होता. हे म्हणणे खरे नाही की, तो ट्रेलर पेट्रोलपंपवर डिझेल भरण्यासाठी आला असताना रिव्हर्स घेताना सदर पत्रे निघाले. हे मला माहित नाही की, तो ट्रेलर आरोपीच्या मालकीचा होता किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो ट्रेलर आरोपी चालवत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी त्या ट्रेलरमध्ये बसलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पेट्रोलपंप मालकाने आरोपींसोबत जमिनीचा वाद असल्याने त्यांचेवर दबाव आणण्यासाठी ट्रेलरद्वारे पत्रे निघाल्याचा फायदा घेऊन खोटी केस दाखल केली आहे. मी पोलीसांना १६ पत्रे व १९ पोल यांचे नुकसान झाल्याचे फिर्याद देताना सांगितले होते. सदर बाब फिर्याद मध्ये का नमुद केली नाही, याचे कारण मला सांगता येत नाही. आरोपींनी पत्रे लोखंडी सळईने ट्रेलरला बांधून ओढून तोडल्याचे मी

फिर्याद देतांना पोलीसांना सांगितले होते. सदर बाब पोलीसांनी फिर्यादमध्ये का नमुद केली नाही, याचे कारण मला सांगता येत नाही. ते पत्रे व पोल अंदाजे १,२५,०००/- रूपयांचे असल्याबाबतची कागदपत्रे मी पोलीसांना दिली होती. जमिनीच्या, पत्राच्या व पोलच्या मालकीची कागदपत्रे दोषारोपपत्रासोबत का दाखल नाहीत याचे कारण मला सांगता येत नाही. पेट्रोलपंप मालकीची ६८ गुंठे जागा होती, हे मी पोलीसांना फिर्याद देतेवेळी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, पत्रे लावलेली जागा आरोपीच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे नाही की, तेथे लावलेले पत्रे व पोल पेट्रोलपंप मालकाच्या मालकीची नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या सांगण्यावरून ट्रेलरद्वारे पत्रे व पोल काढण्यात आले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रेलर चालकाने ते पत्रे पाडल्याने माझे मालकाच्या सांगण्यावरून आरोपीविरूद्ध खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी पेट्रोलपंप मालकाच्या जागेवर अतिक्रमण करून १,२५,०००/- रूपयांचे नुकसान केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी तेथे पत्रे लावलेले आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यानंतर त्यांनी पुन्हा पत्रे लावले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

उरण, (एस.पी. वानखडे )

दिनांक – १७/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण